# नवे कामगार, नवे कायदे !

**- अजित सावंत**

आयटी, मॉल्स्, सेझ, सीप्झ् या क्षेत्रातील कामगारांना भेडसावणारी अस्थिरता व असुरक्षिततेची भावना दूर करणे आवश्यक आहे हे जाणून कामगार कायद्यांमधे सुधारणा करण्याचे राज्य सरकारने योजिले आहे. कामगारांना यामुळे दिलासा मिळणार आहे. कामगार चळवळीमधे निरलसपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनाही मनाला उभारी देणारी ही बाब आहे. उदारीकरणानंतरच्या काळामधे कामगार चळवळीचा लढाऊ बाणा संपल्यात जमा झाला. हक्कांसाठी लढण्याची तयारीही कामगार दाखवेनासा झाला. मालकवर्ग आक्रमकपणे कामगारांचे लढे मोडून काढण्यांत यशस्वी होऊ लागला. आपल्याकडचे उद्योग, अन्य राज्यांमधे जातील ह्या भयगंडाने पछाडलेल्या राज्य सरकारनेही, कामगारांच्या पिळवणुकीकडे दुर्लक्ष करण्यामधे धन्यता मानली. परिणामी उद्योगांमधे अनिष्ट व अनुचित कामगार प्रथांना प्रोत्साहन मिळाले. कारखाने असोत वा मॉल्स, सर्वच क्षेत्रांमधे कंत्राटी कामगार प्रथेचा अनिर्बंध अवलंब करण्यांत येऊ लागला. राज्य व केंद्र सरकारच्या अखत्यारीतील उद्योगही यांस अपवाद ठरले नाहीत. कामगार कायद्यांतून सूट मिळालेल्या सीप्झ् व सेझ सारख्या क्षेत्रांमधे कामगारांना पिळून काढण्याचा परवानाच दिला गेला. सुशिक्षित तरुणांना आकर्षक पगारांनी भुलवणाऱ्या आयटी क्षेत्राने तर कॉल सेंटरमधे वा बीपीओमधून काम करणाऱ्या तरुणांच्या आयुष्याशी खेळच मांडला. परंतु ‘आयटी‘ च्या भुलभुलैयामधे अडकलेल्या तरुणांना याचे भान राहीनासे झाले. उद्योग किंवा मॉल्स असोत वा आयटी, कामगारांची पिळवणूक रोखण्यास कामगार संघटना हतबल ठरल्या. या पार्श्वभूमीवर, या क्षेत्रांतील कामगारांचे शोषण करणाऱ्या व्यवस्थेला आळा घालण्यासाठी कामगार कायद्यामधे सुधारणा करण्याचे राज्य सरकारने ठरवले असेल तर त्याचे स्वागत करावयास हवे. परंतु या निमित्ताने उभ्या रहाणाऱ्या अनेक प्रश्नांचा उहापोह प्रामाणिकपणे करुन दिशादर्शक आराखडा तयार करावा लागेल.

आयटी कंपन्या असोत वा मॉल्स् आजही कामगार कायद्यांच्या प्रभावाखाली येणाऱ्या क्षेत्रांमधे, प्रचलित कायद्यांची तरी अंमलबजावणी योग्य प्रकारे होते कां ? हे प्रथम पहावे लागेल. मुंबई

दुकाने वा आस्थापने कायदा १९४८ या कायद्याखाली तर ही क्षेत्रे येतातच. मग मॉल्स मधे स्वच्छता व देखभाल (हाऊसकीपिंग) कर्मचारी हे किमान वेतनापासून वंचित कां ? कंत्राटी कामगार (नियमन व निर्मूलने) कायदा १९७० ह्या कायद्यातील तरतुदींचा गैरफायदा उठविण्यात यशस्वी झालेल्या बाजारातील 'बिग' खेळाडूना आवर कां घालता येत नाही ? प्रचलित कामगार कायद्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे करणे आवश्यक मनुष्यबळाअभावी किंवा यंत्रणेतील भ्रष्टाचार वा उणीवांमुळे शक्य होत नसेल तर केवळ नवे कायदे करुन वा सुधारणा करुन प्रश्न सुटणार नाहीत, तर या क्षेत्रातील श्रमिकांचे शोषण रोखण्याचा निर्धार राज्य सरकारमधील धुरीणांनी करुन त्या दिशेने पावले उचलणे गरजेचे आहे.

आयटी क्षेत्रामधे अत्यंत संभावितपणे केले जाणारे शोषण पाहिले तर अशी गोंडसपणे पिळवणूक व ती ही सुशिक्षित श्रमिकांची, वानगीदाखलही पहावयास मिळणार नाही. रु. २०,०००/- वा जास्त दरमहा मिळवणारी, तरुण मुले-मुली हाती पडणारे घसघशीत रकमेचे चेक पाहूनच इतकी भारावून जातात की आपले तारुण्य, आपले भवितव्य, आपण फारच कमी किंमतीमधे विकतोय ह्याचे भानही कॉल सेंटर वा बीपीओ मधे नोकरी मिळाल्याचे 'भाग्य' लाभलेल्यांना रहात नाही. परदेशातील वेळांनुसार काम करण्याच्या पध्दतीमुळे, बदललेले शरीरचक्र, अनियमित झोप व जेवण, मानसिक तणावाला आमंत्रण देणारे कामाचे स्वरुप यामुळे आरोग्यावर दुष्परिणाम होतो. अल्प वयामधे अपेक्षेपेक्षा जास्त पैसा हाती खेळू लागल्याने शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. परिणामी भवितव्याचा खेळ-खंडोबा, जोडीला सिगरेट, दारु, अंमली पदार्थ या सारख्या व्यसनांकडे वळण्याची शक्यता यामुळे या क्षेत्रातील तरुण कर्मचाऱ्यांचे भवितव्य अंधकारमय होत आहे. या क्षेत्रातील बहुतांश नोकऱ्या तरुणांसाठीच असल्याने वयाच्या ३०-३५ नंतर रोजगार गमावण्याची वेळही ओढवते व या क्षेत्रातील अनुभव अन्य क्षेत्रांमधे गैरलागू असल्याने, बेकारीचे संकटही आ वासून उभे रहाते, अशी स्थिती आहे. चीन व फिलीपाईन्स् सारखे देश ही ह्या क्षेत्रामधे जोमाने प्रवेश करीत आहेत. अमेरीका व युरोपमधे 'आऊट सोर्सिंग' विरोधाचे वातावरण निर्माण होत असल्याने, त्यांचेकडून मिळणाऱ्या कामावर भारतातील आयटी क्षेत्र कुठवर विसंबून राहू शकेल हा ही एक मोठाच प्रश्न आहे. अशा परिस्थितीमधे नजीकच्या भविष्यकाळामधे या क्षेत्रातून बाहेर पडणाऱ्या लक्षावधी बेरोजगार नैराश्यग्रस्त तरुणांच्या फौजा अराजकाकडे कूच करणार नाहीत याची शाश्वती

कुणी देऊ शकेल कां ? म्हणूनच, या तरुणांचे भवितव्य काही प्रमाणांत कां होईना सुरक्षित ठेवायचे असेल तर, सामाजिक सुरक्षेचे कवच पुरविणाऱ्या कायद्यांच्या प्रभावाखाली हे क्षेत्र आणणे निकडीचे आहे. हाती येणारे भरघोस वेतन व गोंडस 'पदनामे' ह्यामुळे आज हे तरुण कर्मचारी बोनस, ग्रॅच्युईटी, प्रॉव्हिडंट फंड, आदिपासून वंचित आहेत. एव्हढेच नव्हे तर, नोकरीबाबतची सुरक्षितता देणाऱ्या औद्योगिक विवाद कायदा १९४७ या सारख्या कायद्याचे संरक्षणही अनेक क्लृप्त्या लढवून हिरावून घेतले गेले आहे. आयटी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन 'कामगार संघटना' स्थापन करणे म्हणजे जणू पापच असे मानले जाते. त्यामुळे हक्कांबाबत जागरुकता व संघर्ष ह्याला मुळीच थारा नाही. नोकरीवरुन कधीही काढून टाकले जाईल ह्याची टांगती तलवार सतत भेडसावत रहाते. केवळ 'गरोदर' रहाण्याचा गुन्हा केला म्हणून नोकरीवरुन काढून टाकले व ३ महिन्याची प्रसूती रजा देण्याचा बोजा स्वीकारणे व्यवस्थापनाने नाकारले, अशा अन्यायाची परिसीमा करणाऱ्या कहाण्या कानावर येत असतात. तथापि, ह्या क्षेत्रातील कर्मचारी नोकरी गमावण्याच्या भीतीने आपली संघटना बांधण्यास पुढे येत नाहीत. त्याचे प्रमुख कारण म्हणजे कामगार संघटना स्थापनेस असलेला देशी व्यवस्थापनांचा विरोध व त्यांना काम देणाऱ्या परदेशी कंपन्यांमधे, भारतातील कामगार चळवळीबाबत असलेला चुकीचा भयगंड ! आयटी क्षेत्रातील श्रमिकांची संभावितपणे केली जाणारी ही पिळवणूक रोखायची असेल व त्यांचे भवितव्य सुरक्षित राखायचे असेल तर ह्या क्षेत्रातील नोकऱ्यांच्या सेवा-शर्ती, कामाचे स्वरुप, भविष्यातील धोके व संधी, सामाजिक सुरक्षिततेची आवश्यकता संघटीत होण्याच्या मूलभूत हक्काचे रक्षण आदि बाबींना प्राधान्य देणारा केवळ ह्या क्षेत्रास लागू होणारा 'विशेष सर्वकष कायदा' नव्याने करावा लागेल. आयटी क्षेत्र हे देशाच्या अर्थव्यवस्थेस चालना देणारे व रोजगाराच्या नवनव्या संधी उपलब्ध करुन देणारे क्षेत्र असल्याने, उद्योगामधे औद्योगिक संबंध सुरळित राखणे हा या नव्या कायद्याचा गाभा असावयास हरकत नाही. फक्त, देशाला परकीय चलन व राज्याला महसूल देणारा उद्योग म्हणून त्यास श्रमिकांच्या शोषणाचा अलिखित परवाना देणे मात्र गैर ठरेल. बंगळुरुमधे, आयटी क्षेत्रातील उद्योग सरकारी हस्तक्षेपापासून मुक्त असण्याचा पुरेपूर लाभ व्यवस्थापनानी उठवला परंतु औद्योगिक रोजगार कायदा १९४६ पासूनची सवलत काढून घेण्याचे नुसते सूतोवाच तेथील सरकारने केल्यावर लगेचच व्यवस्थापनांनी ओरड सुरु केली. आयटी

उद्योगामधे कामगार संघटनांचा शिरकाव होईल तसेच ‘इन्स्पेक्टर राज‘ सुरु होईल, औद्योगिक शांतता धोक्यात येईल अशी भीती त्यांना वाटू लागली. महाराष्ट्रातील विशेषतः मुंबई-पुण्यातील ‘आयटी उद्योग‘ कामगार कायद्यांच्या प्रभावाखाली आणण्याचा प्रयत्न राज्य सरकारने केल्यास त्यास निकराचा विरोध आयटी कंपन्यांकडून केला जाईल हे निश्चित ! परंतु राज्य शासनाला इच्छा-शक्तीच्या जोरावर ह्या संबंधीचा निर्णय घ्यावा लागेल, कारण हा प्रश्न या क्षेत्रातील श्रमिकांचा तर आहेच परंतु तो सुशिक्षित युवा वर्गाच्या भवितव्याचाही आहे. आयटी उद्योगाच्या बाल्यावस्थेचा काळ आता संपला आहे. भारतामधे विस्तारत चाललेल्या ह्या क्षेत्राला जागतिक पातळीवर आपले स्थान मजबूतपणे टिकवायचे असेल तर कर्मचाऱ्यांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करणे आवश्यक आहे. विविध प्रश्नांच्या सोडवणुकीकरिता कामगार संघटना स्थापन करुन त्या माध्यमातून संवाद साधणे हे कर्मचाऱ्यांच्या व उद्योगाच्याही हिताचे ठरेल यात शंका नाही. म्हणून आयटी क्षेत्रानेही सकारात्मक भूमिका घेऊन राज्य सरकार उचलीत असलेल्या पावलांचे स्वागत करावयास हवे.

रिटेल क्षेत्रामधे थेट परकीय गुंतवणुकीस प्रोत्साहन मिळणार आहे. रिटेल क्षेत्रामधे उतरणाऱ्या वॉल-मार्ट सारख्या आंतरराष्ट्रीय महाकाय खेळाडूंचे डोळे निश्चितपणे जास्तीत जास्त नफ्याकडे लागलेले आहेत. या क्षेत्रामधे श्रमिकांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला व सामाजिक सुरक्षितता लाभणार आहे कां ? की तेथेही पुन्हा ‘कंत्राटी कामगार‘ नियुक्त करुन श्रमाचा अल्प मोबदला देण्याकडेच या परदेशी कंपन्यांचा कल असणार आहे ? आज देशी उद्योगपतीही भव्य चकाचक मॉल्स्च्या झगमगाऱ्या दुनियेत घाम गाळणाऱ्या श्रमिकांना अत्यल्प वेतनामधे १२-१२ तास राबवून घेतात. बोनस, ग्रॅच्युईटी नोकरीतील सुरक्षितता ह्या हक्कांपासून कामगार वंचित रहातात. प्रचलित कायद्यातील या संबंधीच्या तरतुदींची अंमलबजावणी होत नसल्यानेच असे सर्रास घडते. कारखाने असोत वा मॉल्स्, कायमस्वरुपी व थेट उत्पादनाशी किंवा व्यावसायिक सेवांशी निगडित रोजगार कंत्राटी कामगारांवर सोपवून निर्धास्त रहाणे उद्योगांनीही पसंत केले आहे. दुधाने तोंड भाजले म्हणून ताकही फुंकून पिण्याचाच हा प्रकार आहे. १९७० पासून फोफावलेल्या व ८० च्या दशकाच्या अखेरीपर्यंत उद्योगांना जेरीस आणणाऱ्या कामगार संघटनांच्या आक्रमकतेची फळे उद्योग क्षेत्राला चाखायला मिळाली. कामगार संघटनांची ही आक्रमकता पाहून अस्वस्थ झालेल्या

व्यवस्थापनांनी त्यावर उपाय म्हणून ‘कंत्राटी कामगार‘ प्रथेचा अवलंब करण्यास सुरुवात केली. आपल्या सभासद कामगारांना घसघशीत लाभ मिळवून देणाऱ्या कामगार संघटनांनीही या कडे दुर्लक्ष केले. श्रमिकांच्या मुळावर आलेल्या ‘कंत्राटी कामगार‘ प्रथांचे निर्मूलन करण्यामधे शासकीय यंत्रणा अपुरी पडत आहे, म्हणूनच ही प्रथा बोकाळल्याचे चित्र राज्यभरातील विविध उद्योगांमधे पहावयास मिळत आहे. अगदी मंत्रालयामधेही, ‘सफाई कामगार‘ अल्प मोबदल्यात कंत्राटी तत्वावर राबवून घेतले जात आहेत. म्हणून राज्य सरकारने कंत्राटी कामगार प्रथेच्या निर्मूलनाच्या शुभ कामाचा प्रारंभ आपल्यापासूनच करणे अपेक्षित आहे. याकडे अक्षम्य दुर्लक्ष करणारे राज्य सरकार आता उशिरा कां होईना जागे झाले आहे व कंत्राटी कामगार कायद्यातील तरतुदीना हरताळ फासून आपले उखळ पांढरे करु घेऊ पहाणाऱ्यांना चाप लावू पहात आहे हे आशादायक आहे. या दृष्टिकोनातून, केंद्राकडे राज्य सरकारने पाठविलेला कंत्राटी कामगार कायद्यामधे सुधारणा करण्याचा प्रस्ताव मंजूर झाल्यास, कंत्राटी कामगार म्हणून राबवून घेण्यांत येणाऱ्या लक्षावधी श्रमिकांना न्याय मिळेल. पण त्याचबरोबर सरकारी, निमसरकारी, स्थानिक स्वराज्य संस्था ह्यामधील कंत्राटी कामगार प्रथेचे निर्मूलन करण्याचा निर्णय घेणेही आवश्यक आहे. आज अगदी संसद सभागृह इमारतीपासून, मंत्रालयापर्यंत व रेल्वेपासून ते नगरपालिकांपर्यंत अनेक ठिकाणी, सफाई कामगारांना बिनदिक्कतपणे कंत्राटी तत्वावर अत्यल्प वेतनावर राबवून घेतले जाते वास्तविक पहाता सफाईचे काम कायमस्वरुपी नियमित असल्याने, हया कामगारांना कायम कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन व अन्य लाभ मिळावयास हवेत. परंतु सफाईची कंत्राटे, स्वमर्जीतील कंत्राटदारांना बहाल करुन अधिकारी मलिदा खातात व सफाई कामगार जो प्रामुख्याने मागासवर्गिय असतो त्याला किमान वेतनापासूनही वंचित ठेवतात. मात्र राजकीय नेत्यांशी संबंधित ‘भारत विकास ग्रुप‘ सारख्या तथाकथित स्वयंसेवी संस्था मात्र कंत्राटी कामगारांचे शोषण करुन गब्बर होतात. अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासही सरकारने पुढे सरसावयास हवे.

४५ व्या भारतीय श्रम परिषदेमधे बोलताना, पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग ह्यांनी कामगार कायद्यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. ह्याकरिता कामगार संघटनांशी चर्चा करण्याचेही त्यांनी सूचित केले. गेल्या वर्षी ह्याच परिषदेमधे, जाचक

व कठोर कामगार कायद्यांमुळे, रोजगार निर्मितीमधे अडथळे निर्माण होत असल्याबाबत चिंता व्यक्त केली होती. परंतु ह्या वर्षी मात्र पंतप्रधानांचा बदललेला सूर पहाता निवडणुका समोर दिसत असल्याने कां होईना, यूपीए चे केंद्रातील सरकारही कामगार हिताचे कायदे राबवण्याच्या भूमिकेत असल्याचे दिसते. पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारला यामुळे अधिक कणखरपणे अशीच भूमिका घेता येईल.

आजवरचा अनुभव लक्षांत घेता, आयटी उद्योग असो वा मॉल्स् किंवा कंत्राटी कामगार प्रथेचा अनिर्बंध लाभ उठवणारे उद्योग, श्रमिकांच्या हितरक्षणासाठी राज्य सरकार करु पहात असलेल्या सुधारणा या क्षेत्रांच्या सहज पचनी पडतील अशा भ्रमात रहाण्याचे कारण नाही. म्हणूनच या करिता प्रबळ राजकीय इच्छाशक्तीची जास्त गरज भासेल. तसेच ह्या सुधारणा अंमलात आणण्यामधे कुचराई करणाऱ्यांना फौजदारी कायद्याच्या कक्षेत आणण्याची शक्यताही पडताळून पहावी लागेल अन्यथा अशा तऱ्हेची चर्चा ही केवळ ‘बोलाचाच भात, बोलाचीच कढी, जेवोनिया तृप्त कोण झाला ?‘ हया उक्तीप्रमाणे, नुसतीच वायफळ ठरेल.



**(अजित सावंत)**

लेखक मुंबई काँग्रेसचे माजी सरचिटणीस व प्रवक्ता आहेत.

मो.: **98200 69046**

**E-mail: ajitsawant11@gmail.com**